**Maharashtra State Board of**
Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near
Balchitrawani, Behind Agharkar Research
Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९,
बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च
इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 : EPABX -25705000
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.मं./परीक्षा-५/ 5072
पुणे-४११००४ 3312
दि.-१५/११/२०२३
12/12

प्रति,
विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

विषय–डायबेटीज (Diabetes mellitus type) आजार असलेल्या विद्यार्थ्यांना सोयी सवलती मिळणेबाबत...
संदर्भ–शासन पूरकपत्र क्रमांक:संकिर्ण २०१७(११८/१७)/एसडी–६/भाग–१, दि.२६ ऑक्टोबर, २०२३ चे शासनाचे पत्र.

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) पर्यंतच्या विशेष गरजा असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण–२०१७/(११८/१८).एस.डी.–६ दि. १६ ऑक्टोबर २०१८ मध्ये नमूद केल्यानुसार सदर विद्यार्थ्यांच्या अध्ययन शैलीनुसार शैक्षणिक सवलती सर्व विभागीय मंडळामार्फत देण्यात येतात.

याबाबत संदर्भिय शासन निर्णयात डायबेटीज (Diabetes mellitus type) आजार असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रपत्र २२ मध्ये नमूद केलेल्या सवलती व्यतिरिक्त अधिकच्या सोयी सवलती देण्याबाबत शासन स्तरावरून उपरोक्त संदर्भिय शासन शुध्दीपत्रकात नमूद केलेल्या आहेत.

यानुसार आपल्या कार्यकक्षेतील सर्व संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना डायबेटीज (Diabetes mellitus type) आजार असलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) पर्यंतच्या दिव्यांग विद्यार्थ्यास संदर्भिय शासन निर्णयातील अधिकच्या सोयी सवलतीबाबत अवगत करून त्यानुसार प्रस्ताव सादर करणेबाबत आपल्यास्तरावरून कळविण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य मंडळ सादर करावा.

(अनुराधा ओक)
सचिव
राज्य मंडळ, पुणे-०४

क्र.नाविमं/माध्य.ब-१/
नाशिक ४२२००३
दि.१२/१२/२०२३

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त शाळा,
नाशिक/धुळे/जळगाव/नंदुरबार

उपरोक्त राज्यमंडळाच्या पत्रानुसार कळविण्यात येते कि, डायबेटीज (Diabetes mellitus type) आजार असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रपत्र २२ मध्ये नमूद केलेल्या सवलती व्यतिरिक्त अधिकच्या सोयी सवलती देण्याबाबत शासन स्तरावरून उपरोक्त संदर्भीय शासन शुद्धीपत्रकात नमूद केलेल्या आहेत.

त्यानुसार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२४ (इ.१० वी) मध्ये प्रविष्ठ विद्यार्थ्यांना सवलती देणेबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

(डॉ.मच्छिंद्रनाथ कदम)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक ४२२००३

इयत्ता १ ली ते इयत्ता १२ वी पर्यंतच्या विशेष गरजा असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अध्ययन शैलीनुसार मुल्यांकनाबाबत व शैक्षणिक सवलती संदर्भात मार्गदर्शक सूचना.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन पूरकपत्र क्रमांकः संकीर्ण २०१७/(११८/१७)/एसडी-६/भाग-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- २६ ऑक्टोंबर, २०२३

**वाचा:-** १) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०२१/(१५/०१)/प्राशि-५, दि.१३.११.२००१
२) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण विभाग क्र.संकीर्ण १०२१/(१५/०१)/प्राशि-५, दि.२३.०६.२००३
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र.एसएससी १०१९/(१५१/९९)/उमाशि-२, दि.२८.११.२०००
४) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र.संप्रप २००६/(२३१/०६)/प्राशि-५, दि.०७.०९.२००६
५) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र.शैगुवि २०१५/(८०/१५)/एसडी-६, दि.२२.०६.२०१५
६) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०१५/(११९-अ/एसडी-६, दि.०८.०१.२०१६
७) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०१५/(११९-अ)/एसडी-६, दि.१५.०२.२०१६
८) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०१६/प्र.क्र.१९५-अ/एसडी-६, दि.११.०१.२०१७
९) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.अप्रवि २०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दि.१४.०९.२०१८
१०) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०१७/(११८/१७)/एसडी-६, दि.१६.१०.२०१८
११) अध्यक्ष, राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोग, नवी दिल्ली यांचे अर्धशासकीय पत्र क्र.२२७८५०/NCPCR/CH(१)-२०२२-२३/DD४४, दि.२३.०३.२०२३

**प्रस्तावना :-**

विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांना अध्ययन अध्यापन व मूल्यमापनामध्ये गरजेनुसार अध्ययनार्थी दृष्टीकोनातून अध्ययनशैलीनुसार अध्यापन व अनुकूलित (Adaptive) मूल्यांकन पध्दतीचा उपयोग करण्यासंदर्भात शासन स्तरावरुन समिती गठीत करण्यात आली होती. या समितीच्या शिफारशीनुसार इयत्ता १ ली ते इयत्ता १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना अध्ययन शैलीनुसार सुलभ अध्ययन, अध्यापन व अनुकूलित (Adaptive) मूल्यांकन पध्दतीचा व शैक्षणिक सवलतींचा उपयोग करण्याबाबत दि.१६.१०.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये तरतूद करण्यात आली आहे.

२. आता, टाईप-१ मधुमेह (Diabetes mellitus type) आजार असलेल्या विद्यार्थ्यांना अधिकच्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याची शिफारस संदर्भ क्र.११ अन्वये करण्यात आली आहे. त्यानुषंगाने पुढीलप्रमाणे शासन पूरकपत्र निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन पूरकपत्रः-**

संदर्भ क्र.१० येथील शासन निर्णयासोबतच्या **प्रपत्र "अ"** मधील **मुद्दा क्र.२२ -इतर आजारांमुळे शालेय शिक्षणात अडचणी येणाऱ्या** विद्यार्थ्यांबाबत॰ **या अंतर्गत मुद्दा क्र.२२.१ ते २२.१७ नुसार** तरतुदी करण्यात आल्या आहेत.

२. आता, **टाईप-१ मधुमेह** (Diabetes mellitus type) आजार असलेल्या विद्यार्थ्यांना **प्रपत्र "अ" मुद्दा क्र.२२ मध्ये २२.१८ ते २२.२४ अंतर्गत खालील प्रमाणे अधिकच्या सोयी सुविधा अनुज्ञेय असतील.**

- **टाईप-१ मधुमेह असणाऱ्या** विद्यार्थ्यांकरिता आरोग्यविषयक **अतिरिक्त सोयी सुविधा.**

२२.१८ टाईप-१ मधुमेह(Diabetes mellitus type) असणारे विद्यार्थी ज्यांना शाळेच्या सकाळच्या किंवा दुपारच्या सत्रामध्ये खाद्यपदार्थांची (Snaks) आवश्यकता भासल्यास अशा विद्यार्थ्यांना त्यांनी बाळगलेले खाद्यपदार्थ (Snaks) शाळेच्या वर्गखोलीत खाण्याची परवानगी वर्गशिक्षकांनी द्यावी.

२२.१९ मधुमेह असणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांना डॉक्टरांनी खेळामध्ये भाग घेण्यास परवानगी दिली असेल अशा विद्यार्थ्यांना तशा आशयाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर शालेय खेळामध्ये सहभाग घेण्यासाठी परवानगी द्यावी.

- **टाईप-१ मधुमेह असणाऱ्या** विद्यार्थ्यांकरिता **स्पर्धापरीक्षा आणि शाळेच्या इतर परीक्षेच्यावेळी देय असणाऱ्या अतिरिक्त सोयी सुविधा.**

२२.२०टाईप-१ मधुमेह (Diabetes mellitus type) आजार असलेल्या विद्यार्थ्यांना मधुमेहाच्या गोळ्या (Diabetes Tablet) सोबत नेण्याची परवानगी द्यावी.

२२.२१ अशा विद्यार्थ्यांनी सोबत आणलेले औषधे/फळे, खाद्यपदार्थ, पिण्याचे पाणी, बिस्किटे/शेंगदाणे/सुकामेवा इत्यादी परीक्षेच्या हॉलमध्ये शिक्षकांकडे ठेवण्यात याव्यात, आवश्यक असल्यास या बाबी अशा विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान द्याव्यात.

२२.२२शाळेतील कर्मचाऱ्यांनी टाईप-१ मधुमेह (Diabetes mellitus type) आजार असलेल्या विद्यार्थ्यांना ग्लुकोमीटर आणि ग्लुकोज चाचणी पट्ट्या सोबत घेऊन जाण्याची परवानगी द्यावी. ग्लुकोमीटर आणि ग्लुकोज चाचणी पट्ट्या परीक्षेदरम्यान परीक्षा हॉलमध्ये निरीक्षक/शिक्षकांकडे ठेवण्यात येतील.

२२.२३टाईप-१ मधुमेह (Diabetes mellitus type) आजार असलेल्या विद्यार्थ्यांना रक्तातील साखरेची चाचणी करण्याची आणि आवश्यकतेनुसार वर नमूद केलेल्या पदार्थांचे सेवन करण्याची परवानगी द्यावी.

२२.२४CGM (Continuous Glucose Monitoring), FGM (Flash Glucose Monitoring) आणि/ किंवा इन्सुलिन पंप वापरणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान ही उपकरणे ठेवण्याची परवानगी द्यावी. जर Glucose Monitoring साठी स्मार्ट फोन वापरण्यात येत असेल तर तो स्मार्ट फोन शिक्षक/निरीक्षक यांच्याकडे ठेवण्यात यावा.

३. सदरचे शासन पूरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३१०२६१५०४२१०६२१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

IMTIYAZ MUSHTAQUE KAZI

Digitally signed by IMTIYAZ MUSHTAQUE KAZI
Date: 2023.10.26 15:17:05 +05'30'

(इ.मु.काझी)

सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-:

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.सभापती व मा.उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
६. मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
७. मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधान परिषद, मुंबई.
८. मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई.
१०. आयुक्त(शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. आयुक्त, महानगरपालिका(सर्व).
१२. जिल्हाधिकारी सर्व.
१३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व.
१४. मुख्याधिकारी, नगरपालिका, सर्व.
१५. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संचालनालय, पुणे.
१६. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
१७. आयुक्त, दिव्यांगजन कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१८. आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१९. अध्यक्ष, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२०. शिक्षण संचालक ( प्राथमिक ), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२१. शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च-माध्यमिक ), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, राज्य, पुणे.
२२. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
२३. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, संचालनालय, मुंबई.
२४. सहसंचालक/उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळे सर्व.

२५. अध्यक्ष/सचिव, आय.सी.एस.ई., नवी दिल्ली.
२६. अध्यक्ष/सचिव, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ.
२७. अध्यक्ष,राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
२८. संचालक, महाराष्ट्र राज्य, पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ(बालभारती), पुणे.
२९. विभागीय अध्यक्ष, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, सर्व विभाग.
३०. विभागीय सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, सर्व विभाग.
३१. विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग.
३२. विभागीय आरोग्य सेवा उपसंचालक, सर्व विभाग.
३३. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये, सर्व.
३४. अधिष्ठाता, वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालय(सर्व संबंधित रुग्णालये)
३५. संचालक, ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ फिजिकल मेडिसिन आणि रिह्याबिलीटेशन हाजी अली, मुंबई.
३६. संचालक, अलीयावर जंग राष्ट्रीय श्रवण दिव्यांगजन संस्था, बांद्रा, मुंबई.
३७. अधिष्ठाता, केईएम रुग्णालय, मुंबई.
३८. अधिष्ठाता, बा.य.ल नायर रुग्णालय, मुंबई.
३९. अधिष्ठाता, लो.टी. वैद्यकीय महाविद्यालय, सायन रुग्णालय, मुंबई.
४०. शिक्षण संचालक (योजना), पुणे.
४१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/योजना), जिल्हा परिषद (सर्व).
४२. प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, (सर्व).
४३. प्रशासन अधिकारी, महानगरपालिका(सर्व).
४४. निवड नस्ती (कार्यासन-एसडी-६).